अहवाल वर्षात थकीत कर्जदार सभासदांनी केलेले सहकार्य, ठेवीदार व हितचिंतकांनी व्यक्त केलेला विश्वास हया बद्दल मी त्यांचा मनःपुर्वक आभारी आहे. तसेच बँकेचे कर्मचारी व अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य प्रामाणीकपणे पार पाडले हयासाठी मी त्यांचे कौतुक करतो.

असेच सहकार्य सदैव लाभत राहील असा विश्वास व्यक्त करून सन २०१७-१८ मधे बँकेने केलेल्या प्रगतीचा अहवाल आपणासमोर सादर करतो.

## * सभासद व भाग भांडवल -

अहवालाचे वर्षात एकूण ३५१९ नवीन सभासद दाखल झाले असून वर्ष अखेर सभासद संख्या ३७६८१ झाली आहे. भाग भांडवलात रूपये ४,२६,५५,००० /- ने वाढ झाली असून वर्ष अखेर एकूण वसुल भाग भांडवल रूपये ३२,०४,१२,१००/- झाले आहे. बँकेची अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा रूपये ५० कोटी आहे.

## * रिझर्व्ह व इतर फंडस् -

वर्षाच्या सुरूवातीला बँकेचे स्वानिधी(ओन फंड्स) रूपये ५९,३०,०७,४६४/- होते. अहवालाचे वर्षात रू.११,३४,८६,९२७/-ने वाढ होवून वर्ष अखेर एकूण निधीची रक्कम रू. ७०,६४,९४,३९१/- झाली आहे.आपल्या बँकेला आयकर विभागाद्वारे वसुल न झालेल्या थकीत व्याजावरसुध्दा आयकर भरावयास सांगीतले होते. त्यानुसार आपल्या बँकेने जवळपास तीन कोटी रूपयाचा आयकर भरला होता. त्याविरूध्द बँक अपिलमध्ये गेली होती. सदरहु अपिलमध्ये आपल्या बँकेच्या बाजुने निकाल लागलेला असून रक्कम परत मिळाली आहे. त्यामुळे आपल्या स्वनिधीमधे तेवढ्या रकमेने वाढ होईल.

## * ठेवी -

ठेवीच्या विविध योजना बँकेने तयार केलेल्या आहेत. वर्षाचे सुरूवातीला एकूण ठेवीची रक्कम रूपये ८२८,०५,६७,९६८/- होती. अहवालाच्या वर्षात ठेवीमध्ये रू.१८३,७१,६८,१००/- ने वाढ होवून ठेवीची रक्कम वर्ष अखेर रूपये १०११,७७,३६,०६८/-झाली आहे. इतर राष्ट्रीयकृत बँकापेक्षा ठेवीवर आपली बँक अधिक व्याज देते. तसेच सार्वजनिक विश्वस्त संस्था, नगरपालिका, लोकल बॉडीज इ. संस्थांच्या ठेवी स्विकारणे याबाबत आपले बँकेला शासनाकडुन परवानगी मिळाली आहे.

## * घेतलेली कर्जे -

आपल्या बँकेला दि बुलडाणा जिल्हा केंद्रीय सह बँक लि. बुलडाणा बँकेकडून एकूण रू.१ कोटी ४४ लाखाची ओव्हर ड्रॉफ्ट कर्ज मर्यादा मंजूर झाली आहे व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई या बँकेत सरकारी रोखे तारण ठेवून रू. ५०.०० कोटीची ओव्हर ड्रॉफ्ट मर्यादा मंजूर असून दि ३१.३.२०१८ रोजी एकुण रू. ४१लाख ३५ हजार उचल केली आहे. व दि. ३१/०३/२०१८ अखेर देणे बाकी आहे.